-: जय सहकार :-

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ, जि. ठाणे.

नोंदनी क्र–टीएनए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/३७४/सन १९८९-९०

-: कार्यालय :-

१९९४, श्री महालक्ष्मी मंदीर शेजारी, श्री महालक्ष्मी नगर,
अंबननाथ (पूर्व) पिन ४२१५०१ जि. ठाणे.

" शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनीं शुभ बोलावे
शुभ कर्मांच्या सामर्थ्याने करावे जिवनाचे सोने "

" सहकारत ऐपतीपेक्षा पतिला महत्व आहे. " स्थापना : २८ ऑगष्ट १९८९

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ५९५ |
| भाग भांडवल | २,३६,९३०–०० |
| अधिकृत भाग भांडवल | ५,००,०००–०० |
| बचत ठेवी | ३,९०,५००–०० |
| कर्ज वाटप | ८,७५,३००–०० |
| खेलते भांडवल | ७,०५,३७४–५० |
| वार्षिक उलाढाल | ८,९९.६९६–४५ |

# द्वितिय वार्षिक अहवाल

## सन १९९०-९१

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
## अंबरनाथ, जि. ठाणे.

## -: संचालक मंडळ :-

| | | |
|---|---|---|
| श्री. जयवंत बंडू काटकर SEM | - | चेअरमन |
| ,, अनंत नारायण आंबरे B.A. | - | व्हा. चेअरमन |
| ,, हणमंत सदाशिव घनवट | - | चिटणीस |
| ,, भिमराव यशवंत सुर्यवंशी B. Com | - | खजिनदार |
| ,, सुभाष शामराव भावसार | - | संचालक |
| ,, अविनाश नारायण खानविलकर | | ,, |
| ,, अशोक तुकाराम चौधरी | | ,, |
| ,, भालचंद्र यशवंत माने | | ,, |
| ,, प्रकाश शंकर पाटील | | ,, |
| सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव | | ,, |
| श्री. संजय जगन्नाथ दरेकर | | ,, |
| ,, भगवान अर्जुन उतेकर | | ,, |
| ,, हरिश्चंद्र यशवंत येरुणकर | | ,, |

---

## -: अंतर्गत हिशोब तपासनीस :-

श्री. शंकरराव केशवराव दरेकर

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव B. Com

# - भावपूर्ण श्रध्दांजली -



संचालक मंडळ श्री महालक्ष्मी नागरी सहकारी
पतपेढी मर्यादित अंबरनाथ.

अंतरर्गत हिशोब तपासनीस





श्री. शंकरराव के. दरेकर

श्री. कृष्णाजी रा. यशवंतराव B. Com.


-: हार्दीक शुभेच्छा -

खास वैशिष्ठचे नावाजलेल्या कंपण्याच्या लग्न पत्रिका स्वस्त दरांत छापून मिळण्याचे अंबरनाथ मधील एकमेव ठिकाण.

फोन नं. २४३६

**अंबरनाथ मुद्रणालय**

शिव मंदीर रोड, बँक ऑफ इंडिया समोर, अंबरनाथ-४२१ ५०१.

प्रो. सावंत बंधू

स्फुर्तीस्थान



श्री. नलावडे

कोकणचे नेते



श्री. नकुल पाटील

चेअरमन



श्री. जयवंत बंडू काटकर

– संचालक मंडळ –



श्री. अनंत ना. आंबरे
व्हा. चेअरमन



श्री. भिमराव य. सुर्यवंशी
खजिनदार



श्री. हणमंत स. घनवट
चिटणीस

## संचालक मंडळ


श्री. भालचंद्र य. माने


श्री. प्रकाश शं. पाटील



श्री. भगवान अ. उतेकर


श्री. सुभाष शा. भावसार


श्री. अविनाश ना. खानविलकर


श्री. अशोक तु. चौधरी


श्री. संजय ज. दरेकर


श्री. हरिश्चंद्र य. येरुणकर


सौ. नलिनी कृ. यशवंतराव

"जय सहकार"

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,

अंबरनाथ जि. ठाणे.

ऑडीट वर्ग "अ"

## वार्षिक सर्वसाधारण सभा

# जाहीर नोटीस

(फक्त सभासदाकरीता)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, संस्थेची **वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार दिनांक ३–११–९१ रोजी दुपारी २ वाजतां श्री महालक्ष्मी मंदिर सभागृह अंबरनाथ (पूर्व) येथे आयोजीत केली आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती,

## – सभेपुढील विषय –

१) मागील सर्वसाधारण सभेचे इतीवृत्त वाचून कायम करणे.

२) सन ९०–९१ चा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक मंजूर करणे.

३) सन ९०–९१ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

४) ९१–९२ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासनिसांची निवड करणे व मानधन ठरवणे.

५) पोट नियम दुरुस्तीबाबत विचार करणे.

६) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीनें चर्चा करणे,

दिनांक १९–१०–९१

हणमंत स. घमवट
चिटणीस

टिप – १) सभासदांनी आपल्या सुचना अगर प्रश्न संस्थेच्या कार्यालयात दिनांक ३–११–९१ पर्यंत लेखी पाठवाव्यात.

२) सर्व सभासदांनी सभेस येताना अहवाल बरोबर आणावा.

३) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयांवर सभेच्या कामकाजास सुरुवात होईल. त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.

" विना सहकार नही उध्दार "

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे

# – द्वितीय वार्षिक अहवाल –

## सन १९९०–९१

सन्माननिय सभासद बंधुभगिनींनो,

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा ३० जून ९१ अखेरचा वार्षिक अहवाल संस्थेची सांपत्तीक स्थिती दर्शविणारे ताळेबंद नफातोटा पत्रक आपल्या समोर ठेवतांना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेनें चालू वर्षात केलेली नेत्रदिपक प्रगती व जनमानसात मिळविलेले मानाचे स्थान याची सविस्तर माहिती देणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. त्याचप्रमाणें आपण केलेल्या सहकार्याबद्दल मी आपले स्वागत करतो.

सभासद, ठेवीदार, खातेदार, मार्गदर्शक, त्याचप्रमाणें हितचिंतक या सर्वांच्या आशिर्वादाने व निर्मळ प्रेमाणें आपण सर्वजण समाधानाच्या शिखरावर आलो आहोत. याचा अभिमान वाटतो. नागरिकांमध्ये संस्थेचे सभासद होणें विषयीं वाढलेली उत्सुकता पहाता ही संस्थेच्या संचालक मंडळानें केलेल्या प्रामाणिक कामाची पावती असे मी समजतो.

संचालक मंडळानें परिश्रमपूर्वक पतसंस्थेची केलेली सर्वांगीण प्रगती खालील तक्त्यावरुन लक्षांत येईल.

| अ. नं. | तपशील | १९८९–९० | १९९०–९१ |
|---|---|---|---|
| १ | सभासद | ४६० | ५९५ |
| २ | भागभांडवल | ८७,३७०–०० | २,३६,९३०–०० |
| ३ | ठेवी | १,७५,५००–०० | ३,९०,५००–०० |
| ४ | कर्ज | २,९६,५००–०० | ८,७५,३००–०० |
| ५ | खेळते भांडवल | २,६९,८३९–५० | ७,०५,३७४–५० |
| ६ | नफा | ५,२७१–५० | २१,१७८–०० |

**ठेवी :–** ठेवी हा संस्थेचा प्रगतीचा पाया आहे. तो मजबुत करण्यासाठी संस्थेचे संचालक मंडळ अथक परिश्रम घेत असते. अहवाल सालात संस्थेकडे एकूण रु. ३,९०,५००।– ठेवीच्या रुपात जमा आहेत.

**नफा :–** अहवालसाली संस्थेस एकूण नफा रु. २१,२३१–५० एवढा झाला आहे. नफ्याचा विनियोग तक्ता सोबत जोडला आहे. त्यास आपण मंजुरी द्याल अशी अपेक्षा करतो.

**कर्ज :–** सभासदांची अडचण लक्षांत घेऊन संचालक मंडळाने सभासदांना तत्परतेने, सुलभतेनें, व विनाविलंब कर्ज सहाय्य देण्याचे विशिष्ठ धोरण अबलंबीले आहे. सभासदांच्या गरजा भागवून कुंटुबियांचे जीवन समृद्ध व संपन्न व्हावे ही सदिच्छा ठेवुन अहवालसाली संस्थेनें एकूण कर्जवाटप रु. ८,७५,३००।– केले आहे,

**सभा :–** अहवाल साली एकूण १२ सभा झाल्या. सभासदांच्या अडचणी लक्षांत घेऊन तांतडीच्या २ सभा झाल्या. असून सर्व ठराव सर्वांनुमते पास झाले आहेत. शिवाय दैनंदिन कामकाजात विचार विनिमय करण्यासाठी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत पदाधिकारी व संचालक कार्यालयात हजर असतात.

**आभार :–** संस्थेस अनेंक मान्यवरांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. त्याच्या या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त करणें हे माझे आध्यकर्तव्य आहे. ठाणें जिल्ह्याचे नेते व सिडकोचे चेअरमन मा. नकुल पाटील अंबरनाचे माजी नगराध्यक्ष मा. दादासाहेब नलावडे मा. सहाय्यक निबंधक उल्हासनगर त्यांचे अधिकारी व कर्मचारी वर्ग, श्री. अस्वले, शाखाधिकारी, व कर्मचारी ठाणें जिल्हा मध्यवर्ती बँक, अंबरनाथ श्री. बी. एस. टिपणीस, शासकीय प्रमणीत हिशेब तपासणीस व सहकारी, श्री. एस. एस. भगत जनरल मॅनेंजर मेकॉन इंजिनिअरिंग कं, श्री. बाळासाहेब सोनजे उपमुख्याध्यापक, भाऊसाहेब परांजपे विद्यालय, श्री. वसंतराव मोहीरे लेखाधिकारी म. रा. वि. मं. मुंबई या सर्वांनी केलेल्या आमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे हार्दीक आभार मानतों. तसेच अंतर्गत हिशेब तपासणीस श्री. शंकरराव दरेकर व श्री. कृष्णाजी यशवंतराव यांनी उत्तम प्रकारे केलेल्या कामाबद्दल धन्यवाद.

**श्रध्दांजली :–** राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्राणाची आहुती देणारे भारत रत्न विभुषीत स्व. पंतप्रधात श्री. राजीव गांधी यांस सस्थेच्यावतीनें भावपूर्ण श्रध्दांजली आर्पण करतो.

**समारोप :–** आपण सर्वांनी अत्यंत कष्टानें, चिकाटीने या लावलेल्या सहकारी रोपट्याचे रोपन केले आहे. त्यास आपणा सर्वांनी मिळून खतपाणी घालुया व त्याचे विशाल वटवृक्षात रुपांतर करुया हीच मनिषा. सहकारी क्षेत्रामध्ये संस्थेचा उत्कर्ष तिच्या कर्ज वसुलीवर अवलंबून असतो. आपल्या संस्थेची वसुली १०० टक्के असते व ती करण्यासाठी आपण सर्वचजण सहकार्य करीत असता. या बहुमोल कार्याचा येथे अवर्जून उल्लेख करणें आम्हा संचालक मंडळाचे आद्य कर्तव्य समजतो.

माननीय सभासद बंधू भगिनीनों आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल विश्वास दर्शविला आहे त्यास कोणत्याही प्रकारचे गालबोट न लावता आपला नितांत आदर बाळगून संस्थेचा कारभार जबाबदारीने निस्पृहतेने करु अशी ग्वाही देऊन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारा सन १९९०–९१ चा अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक

संचालक मंडळाच्या वतीने आपल्या समोर मंजुरीसाठी विनम्रतेने सादर करीत आहे. तरी त्यास आपणा सर्वांनी मंजुरी द्यावी ही विनंती.

धन्यवाद,

जयहिंद – जयसहकार

संचालक मंडळाच्या वतीने

**श्री. जयवंत बंडू काटकर**

अध्यक्ष

## संचालक मंडळाच्या सभा

अहवाल साली कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या.

| अ. नं. | सदस्याचे नांव | | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | श्री. जयवंतराव बंडू काटकर | – | १२ |
| २ | श्री. अनंत नारायण आंबरे | – | १२ |
| ३ | श्री. हणमंत सदाशिव घनवट | – | १२ |
| ४ | श्री. भिमराव यशवंतराव सुर्यवंशी | – | १२ |
| ५ | श्री, सुभाष शामराव भावसार | – | ८ |
| ६ | श्री. अविनाश नारायण खानविलकर | – | १२ |
| ७ | श्री. अशोक तुकाराम चौधरी | – | १२ |
| ८ | श्री. भालचंद्र यशवंत माने | – | ८ |
| ९ | श्री. प्रकाश शंकर पाटील | – | १२ |
| १० | सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव | – | १२ |
| ११ | श्री. संजय जगन्नाथ दरेकर | – | ८ |
| १२ | श्री. भगवान अर्जुन उतेकर | – | १२ |
| १३ | श्री. हरिश्चंद्र यशवंत येरुणकर | – | ८ |

## *वार्षिक अहवालाचे परिशिष्ट सन १९९०–९१*

**संस्थेचे कार्यक्षेत्र – अंबरनाथ शहर मर्यादित**

**संस्थेच्या शाखा – कोठेही नाही.**

**सभासद – फक्त रितसर व्यक्तिगत सभासदांची नोंदणी केलेली आहे.**

**भागभांडवल – संस्थेचे भागभांडवल फक्त वैयक्तिक सभासदांनी उभारले आहे.**

**कर्ज – कर्ज देणाऱ्या कोणत्याही संस्थेकडून अद्याप कर्ज घेतले नाही.**

With Best Compliments From :

# SAGAR
## ENTERPRISES

: Specialist in :
FABRICATION OF M. S./S. S.
PIPING STRUCTURE & ERECTION
OF EQUIPMENT.

Dhuri House 1517, Mahalaxmi Nagar,
Ganpati Mandir Road, Ambarnath-421501

*D. B. Dhuri*

– हार्दीक शुभेच्छा –

# राज लक्ष्मी इंटर प्राईजेस

एम. आय. डी. सी.
बदलापूर

– हार्दीक शुभेच्छा –

आपल्या दररोजच्या बचतिसाठी व भविष्य काळासाठी
आपण आपले दैनंदिन बचत योजनेंत
आपले खाते काढा.

**संचालक मंडळ श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ.**

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व)

## तेरीज पत्रक १-७-९० ते ३०-६-९१

| जमा | रुपये पैसे | नांवे | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक रोख आणि बँक | १,७०१-५० | बँक प्रवेश फी नांवे | १०-०० |
| प्रवेश फी | १३५-०० | सभासद भाग परत | ५९०-०० |
| भाग जमा | १,५०,१५०-०० | सभासद दिर्घ मुदत कर्ज | ८,७५,३००-०० |
| सभासद कर्ज जमा | ४,४८,२१०-०० | छपाई व स्टेशनरी | ७,८२१-८५ |
| कर्जावरील व्याज | ८३,०७०-०० | किरकोळ खर्च | ५६-१० |
| छपाई आणि स्टेशनरी | १,४२५-०० | प्रवास खर्च | १३३-०० |
| बँक व्याज जमा | ४-९५ | वार्षिक सभा खर्च | २०१-०० |
| सभासद मुदत ठेव जमा | २,१५,०००-०० | बँक भाग | १००-०० |
| | | कार्यालय भाडे | २,२००-०० |
| | | फर्निचर खरेदी | ५,५२०-०० |
| | | मानधन नांवे | २,०००-०० |
| | | अखेर शिल्लक रोख आणि बँक | ५,७६४-५० |
| | ८,९९,६९६-४५ | | ८,९९,६९६-४५ |

| हणमंत स. घनवट | भिमराव य. सुर्यवंशी | अनंत ना. आंबरे | जयवंत बं. काटकर |
|---|---|---|---|
| चिटणीस | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ (पूर्व)

### नफा तोटा पत्रक १–७–९१ ते ६०–६–९१

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| बँक प्रवेश फी | १०–०० | व्याज | ८३,०७०–०० |
| छपाई व स्टेशनरी | ७,८२१–८५ | बँक व्याज | ४–९५ |
| किरकोळ खर्च | ५६–१० | छपाई जमा | १,४२५–०० |
| प्रवास खर्च | १३३–०० | | |
| वार्षिक सभा खर्च | २०१–०० | | |
| कार्यालय भाडे | २,२००–०० | | |
| मानधन | २,०००–०० | | |
| देणे – ऑडीट फी | १,२००–०० | | |
| देणे – ठेवीवरील व्याज | ४१,०००–०० | | |
| देणे – शिक्षण निधी | १,०००–०० | | |
| देणे – कर्मचारी पगार | ७,२००–०० | | |
| देणे – अंतरगत हिशोब तपासणीस फी | ५००–०० | | |
| निव्वळ नफा | २१,१७८–०० | | |
| | ८४,४९९ ९५ | | ८४,४९९–९५ |

## नफा विनियोग तक्ता

| नफा वाटणी सन ९०–९१ | | जमा रक्कम | |
|---|---|---|---|
| २५ टक्के राखीव निधी | ५,२९५–०० | मागील शिल्लक नफा | ५३–५० |
| २० टक्के इमारत निधी | ४.२५०–०० | ३०–६–९१ पर्यंतच नफा | २१,१७८–०० |
| २ टक्के लाभांश समिकरण निधी | ४५०–०० | | |
| २ टक्के धर्मदाय निधी | ४५०–०० | | |
| सभासद कल्याण निधी | ७००–०० | | |
| रौप्य महोत्सव वर्षापन निधी | ५००–०० | | |
| शिल्लक नफा | ९,५८६–५० | | |
| | २१,२३१–५० | | २१,२३१–५० |

| हणमंत स. घनवट | भिमराव य. सुर्यवंशी | अनंत ना. आंबरे | जयवंत बं. काटकर |
|---|---|---|---|
| चिटणीस | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

अंतरगत हिशोब तपासणीस

**श्री. शंकरराव केशवराव दरेकर** **श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव**

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी

## दिनांक १–७–९० ते ३०–६–९१

| १९८९–९० | कर्ज व देणे | | १९९०–९१ |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | | रुपये पैसे |
| २,००,०००–०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,०००–०० |
| ८७,३७०–०० | वसूल भाग भांडवल | | २,३६,९३०–०० |
| ४६०–०० | राखीव निधीं | ४६०–०० | |
| | प्रवेश फी ९०–९१ | १३५–०० | |
| | ८९–९० | १,३१८–०० | १,९१३–०० |
| १,२३८–७० | अनामत | | |
| १,७५,५००–०० | मुदत ठेव | | ३,९०,५००–०० |
| | **देणे व तरतुदी** | | |
| | ऑडीट फी | १,२००–०० | |
| | शिक्षण निधी | १,०००–७० | |
| | पगार | ७,२००–०० | |
| | अंतरगत हिशोब तपासणीस फी | ५००–०० | |
| | ठेवीवरील व्याज | ४४,९००–०० | ५४,८००–०० |
| | **निव्वल नफा** | | |
| ५,२७१–५० | चालू वर्षाचा नफा | २१,१७८–०० | |
| | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ५३–५० | २१,२३१–५० |
| २,६९,८३९–५० | | | ७,०५,३७४–५० |

**हणमंत स. घनवट** चिटणीस — **भिमराव य. सुर्यवंशी** खजिनदार — **अनंत ना. आंबरे** उपाध्यक्ष — **जयवंत बं. काटकर** अध्यक्ष

वरील हिशोब उपलब्ध कागदपत्रावरुन बरोबर आहेत.

**श्री. शंकरराव केशवराव दरेकर** — **श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव**

अंतरगत हिशोब तपासनीस

# पतपेढी मर्यादित, अंबरनाथ (पूर्व)

## अखेरचा ताळेबंद

| १९८९–९० | जिंदगी व येणे | १९९०–९१ |
|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे |
| | **रोख शिल्लक** | १,१०१–३५ |
| १,७०१–५० | बँक शिल्लक | ४,६६३–१५ |
| २,६६,९००–०० | **सभासद कर्ज** | ६,९३,९९०–०० |
| | ठांणे जिल्हा मध्यवर्थी सहकारी बँक भाग | १००–०० |
| | **फ्रनिचर** | ५,५२०–०० |
| १,२३८–०० | अनामत | — |
| २,६९,८३९–५० | | ७,०५,३७४–५० |

**हणमंत स. घनवट**
चिटणीस

**भिमराव य. सुर्यवंशी**
खजिनदार

**अनंत ना. आंबरे**
उपाध्यक्ष

**जयवंत बं. काटकर**
अध्यक्ष

वरील हिशोब उपलब्द कागदपत्रावरुन बरोबर आहेत.

**श्री. शंकरराव केशवराव दरेकर** **श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव**

अंतरगत हिशोब तपासनीस

# सभासदांना सूचना

१) आपल्या पत्त्यात बदल झाल्यास त्याची सुचना पतपेढीस द्यावी. म्हणजे पत्रव्यवहारास सुलभ होईल.
२) सभासदास वारस नेमता येतो. ज्यांनी वारस दिलेला नसेल त्यांनी रितसर अर्ज करुन वारस नेंमावेत व सभासदांनी अडचणी टाळाव्यात.
३) आपली पत व पतपेढीचा दर्जा वाढविण्यासाठी कर्जाचे हप्ते व वर्गणी नियमित भरुन संस्थेस सहकार्य करा त्याचा फायदा लाभांश रुपानें मिळवा.

## श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढीची उद्दिष्टे

१) सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकाराची भावना रुजवणे.
५) सभासदांना त्यांच्या आपत्तीच्या काळात मदत करणे.
३) आपल्या सहकार्यातून अन्यांचे जीवनमान उंचावणेस मदत करणे.
४) अल्दबचतीची संवय निर्माण करुन भविष्यातील अडचणीवर मात करणें.
५) वाजवी शर्तीवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.
६) वरील उल्लेखलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हातीं घेणे.

# आवाहन !

प्रिय सभासदांन विनम्र आवाहन ! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्यानें आपण सर्वांना आवाहन करू इच्छितो की, आपली ही विशाल उद्दिष्टें साध्य करावयाची असतील तर मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे. आपल्या गरजा भागविणे सोयीचे व्हावे म्हणून आपण स्वत:, आपले मित्र व स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तींत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक हातांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो. आपल्या ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाईल.

तरी माझ्या सभासद बंधू आणि भगिनिंनो आपण योग्य प्रतिसाद द्याल ही अपेक्षा.

"जयहिन्द –

"विना सहकार नाही उध्दार"

**श्री. जयवंतराव बंड् काटकर**
अध्यक्ष

# पोट नियम दुरुस्ती

| पोट नियम क्र. | सध्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीची कारणे |
|---|---|---|---|
| ह १–८ | वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडुन आलेल्या १२ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी एक सदस्य अनुसुचित जाती/जमाती व एक सदस्य की, जो आर्थिक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्य–मधून असावा. अशी व्यवस्थापक समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य निवडुन आलेल्या सदस्यातून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) ७ राहील.<br>संचालक मंडळाची मुदत ३ वर्ष ( सहकार वर्ष ) राहिल. संचालक मंडळाची निवडणुक गुप्त मतदान पध्दतीनें घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणुकीस पुरेशे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास तसे उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहीजे व त्यांच्या सुचनेंनुसार व्यवस्था केली पाहीजे.<br>कलम ७३ (अ) प्रमाणें सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही. व पुन्हा पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षाचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थासाठी लागू होईल.<br>पोट नियम व साधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावाच्या तरतुदीच्या उपबंधास अधिन राहुन, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थीत असलेल्या संचालकाला फक्त महिन्यातून एक वेळ मीटींग भत्ता रु. १०।– घेता येईल, | वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती/जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्यामधून असावा अशी व्यवस्था समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य निवडूत आलेल्या व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorun) ७ राहील.<br>संचालक मंडळांची मुदत ५ वर्षे (सहकार वर्ष) राहील. संचालक मंडळाची निवडणूक गुप्तमतदान पध्दतीनें घेतली पाहिजे संचालक मंडळाच्या निवडणुकीत पुरेशे अर्ज न आल्यास निवडून आलेले कार्यकारी मंडळ उर्वरीत सदस्यांची नेंमणुक करील.<br>पोटनियम व साधारण सभेनें मंजुर केलेल्या ठरावाच्या (तरतु–दीच्या) उपबंधास अधिन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजा-साठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहीजे.<br>संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून १ वेळ मिटिंग भत्ता रु. १०/– घेता येईल. | महाराष्ट्र शासन आदेश क्र. सी.सी. आर–१८९१/सी. आर–११२/७–स दि. १२–७–९१ अन्वये कालावधीत बदल झाल्यामुळे |

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढीस हार्दीक शुभेच्छा

## अंबरनाथ मैत्रीणी औधोगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादीत अंबरनाथ.

सौ. निलम आंबरे
सेक्रेटरी

कु. मिरा कथेट
खजिनदार

सौ. शोभना नलावडे
अध्यक्ष

---

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढीस हार्दीक शुभेच्छा

## श्री महालक्ष्मी रहिवासी संघ

श्री. हरिश्चंद्र येरुणकर
सरचिटणीस

श्री. भिमराव सुर्यवंशी
अध्यक्ष

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,
# अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे

## अंतर्गत लेखा परिक्षकाचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ या संस्थेचा सोबत जोडलेल्या सन १९९०–९१ चा तेरीज, नफा–तोटा पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणें व विश्वासाप्रमाणें जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरुन संस्थेनें महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणें योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

२) आम्ही तपासलेले तेरीज नफा–तोटा पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशेबाची पुस्तकाशी व विवरणाशी जूळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहीतीप्रमाणें तसेच आम्हांला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीनें आवश्यक अशी माहिती देतात.

अंबरनाथ

दिनांक १ ऑगष्ट ९१

अंतर्गत हिशोब तपानणीस

**श्री. शंकरराव केशवराव दरेकर** **श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराद B.Com.**

९४
२०
९५०
२६४

## सर्व भागधारक व ठेवीदार यांना
## नूतन वर्ष सुख समृद्धीचे
## व भरभराटीचे जावो.



*श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित*

*अंबरनाथ.*

BOOK - POST

श्री./श्रीमती श्री. कृष्णा रावजी कदम

श्री महालक्ष्मी नगर

प्रकाशक : श्री. जयवंतराव बंडू काटकर, चेअरमन-श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या अंबरनाथ.

मुद्रक : अंबरनाथ मुद्रणालय फोन नं. २४३६